Vol 6 Issue 2 March 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

### Regional Editor

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 2 | March - 2016

# सातपुड्यातील आदिवासींच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास



प्रा. दिलीप आत्माराम शिरसाठ
इतिहास विभाग प्रमुख, ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. म. दि.सिसोदे उर्फ भाऊसाहेब कला, वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

## प्रास्ताविक :

मानवाने स्वतःच्या ऐहिक सुखाकरिता प्रागतिक धडपडीतून आपल्या सभोवतालच्या निसर्गावर वर्चस्वाचा सतत प्रयत्न केला आहे. त्याने साध्य केलेल्या भौतिक प्रगतीमुळे मानवी जीवन अधिकाधिक सुखासीन झाले. असे असले तरी मानवी प्रयत्नांना काही मर्यादा निश्चितच आहेत. कारण निसर्गाशी केलेल्या आततायी स्पर्धेमुळे अतिवृष्टी, महापूर, अवर्षण, वादळ, भूकंप, रोगराईसारख्या भीषण संकटांना सामोरे जावे लागते. म्हणूनच आदिवासी लोकांनी या नैसर्गिक शक्तींना देवत्व प्रदान करून त्याविषयीच्या अनेक श्रद्धा निर्माण झाल्या होत्या. यातूनच आदिवासी समाजामध्ये सामूहिक आणि व्यक्तिगत व कौटुंबिक पातळीवर अनेक धार्मिक कल्पनांचा उदय झाला. त्यात धर्मश्रद्धा, शक्तीवाद, देव–देवता, सण–उत्सव, नाच–गाणे याबाबी अस्तित्वात आल्यात. तसेच भगत, शिकार ही काही सांस्कृतिक वैशिष्ट्ये ही आदिवासींची आहेत. याचबरोबर मूर्तिकला, चित्रकला, मुखवटे, लाकडावरील कोरीव काम यात हा समाज प्रगतीपथावर आहे. कुटुंब, स्त्रियांचे स्थान, आभूषणे, सण–उत्सव, जादू–टोणा, पंचायतव्यवस्था, धर्माचरण अशी वैशिष्ट्ये असलेला आदिवासी समाज हा अल्पसंतुष्ट असल्याचे लक्षात येते.

## आदिवासींचा धर्म :

निसर्गातील न समजणाऱ्या बाबींना आदिवासी अलौकिक शक्तींचे अस्तित्व मानून त्यांचे सहाय्य मिळावे म्हणून विशिष्ट प्रकारची आचारसंहिता पाळतो. याच बाबींवर धर्माची उभारणी झाली आहे. धर्म म्हणजे ष्मानव व त्याचे र्प्यावरण यामधील संबंधाविषयीच्या संकल्पनेला

निश्चित स्वरूप देणारी व प्रत्येक संस्कृतीत आढळणारी श्रद्धा व आचार यांची व्यवस्था म्हणजे धर्म होय.ष अशी व्याख्या डॉ. विलास संगवे देतात.1 तसेच प्रा. पी. गिस्बर्ट, सर जेम्स फ्रेझर, डॉ. आर. एन. मुखर्जी, डॉ. इ. ए. होबेल या विद्वानांनीही मोजक्या स्वरूपात धर्माच्या व्याख्या केल्या आहेत.

### धर्मश्रद्धा :

आदिवासी लोकांमध्ये सर्वत्र दिसणारा आणि प्रामुख्याने आढळणारा सर्वात्मवाद होय. अलौकिक विश्वातील दिव्य प्राण्यांचे स्वरूप व लक्षण यावरील विश्वास म्हणजेच सर्वात्मवाद होय. आत्मा म्हणजे आपल्या शरीरात वास्तव्य करणारे मूलतत्त्व होय, असे आदिवासी लोक मानतात. तर आपल्या शरीराबरोबरच काही अलौकिक विश्वात वावरत असतात त्यांनाच 'दिव्य प्राणी' असे म्हणतात. त्यात प्रेतात्मा, भूत, पिशाच्य, देव यांचा समावेश होतो. हे दिव्य प्राणी मानवांच्या जीवनावर हुकूमत गाजवू शकतात.

असे आदिवासी लोक मानतात. तसेच सर्व प्रकारच्या वस्तूत राहू शकणाऱ्या व अत्यंत विलक्षण सामर्थ्य असणाऱ्या अलौकिक शक्तीच्या अस्तित्वावरील विश्वास ही कल्पना म्हणजेच 'आदिवासी शक्तिवाद होय.' आयुधे, हत्यारे, नाव यामध्ये आदिवासी लोक अलौकिकत्त्व मानतात.

सातपुड्यातील आदिवासी आपला धर्म हिंदू असल्याचे मोघमपणे सांगतात. देव–देवता, सण–दिन, मूर्तिपूजा, लग्नपद्धती, दागदागिने, कुंकू लावणे इत्यादी प्रथा परंपरा 'हिंदू' धर्माप्रमाणेच करतांना दिसतात. असे असले तरी आदिवासी समाजातील लेखकांची मते मात्र वेगळीच आहेत. कारण आजच्या प्रस्थापित हिंदूधर्मियांनी हिंदू चालीरीती आदिवासी समाजावर लादल्या आहेत. आदिवासींची मानसिकता हिंदू धर्माशी जोडण्याचा प्रयत्न चालविला आहे. वास्तवात आदिवासी जमातीचा कोणताही असा एक धर्म नाही त्यांची जीवनप्रणाली, निसर्गसानिध्य, नैसर्गिक देव–देवता, नैसर्गिक जीवन जगण्याच्या परंपरा, निकोप–निर्भेळ जीवन प्रणाली, समूहपद्धती, आचार हाच आदिवासींचा मुख्य, अनादि–अनंत ष्धर्मष आहे.[2]

### देव–देवता :

आदिवासी लोकांची देवावर निःस्सीम अशी श्रद्धा आहे. 'देवाशिवाय देह नाही आणि दुनियाही नाही' हेच वचन त्यांच्या मनात पक्के बिंबलेले आहे. पाड्या–पाड्यांतून ग्रामदैवतांची पूजा–अर्चा केली जाते. उत्सव साजरे होवून यात्राही भरविल्या जातात. त्यांची दैवते झाडाखाली लाकडी किंवा दगडी मूर्तीत कोरलेली असतात. गावदेवता, गावमेंढ्या, पूजपावा, वाघदेव, विजालाराणी, निलीचारी, अन्नदेव, आगदेव, पाणदेव इत्यादी देव–देवता होत.

***1) याहामोगा देवी*** – याहामोगा देवी ही आदिवासी जमातीचे कुलदैवत असून या देवीविषयी अनेक कथा सांगितल्या जातात. पूर्वी अक्कलकुवा तालुक्याच्या पहाडी भागात 'दाब' नावाचे आदिवासी राजाचे राज्य होते. सभोवतालच्या गावांना जोडून असल्यामुळे या राज्याला 'दाबमंडल' असे म्हणत. दाबमंडलच्या पश्चिम भागात असलेल्या आंबुडा पाटीचा राजा राजापांठा यांची दुसरी राणी याहामोगी असल्याचे वाचावयास मिळते. दुष्काळीकाळात लोकांना केलेल्या मदतीमुळेच याहामोगादेवीला लोकमाता मानू लागले. महाशिवरात्रीला या देवीची पूजा होते. ही देवीची मूर्ती मानवी प्रतिकृती असून कष्टकरणाऱ्या स्त्रीचे प्रतीक आहे. सातपुड्यातील आदिवासी जमातीत ष्याहामोगाष देवीला अनन्य साधारण महत्त्व आहे. मुख्य दैवत असलेल्या या देवीवर आदिवासींची मोठी श्रद्धा आहे. दुसरी एक देवता म्हणजे 'आया' होय. या देवीचे ठाणे पाड्याच्या वस्तीबाहेर असते.

***2) वाघदेव*** – दऱ्याखोऱ्यात, जंगलात राहणाऱ्या आदिवासींचे वाघासारख्या वन्यप्राण्यांशी त्यांचा संबंध येत असतो. अशा हिंस्त्र प्राण्याविषयीच्या कृतज्ञताभाव म्हणून वाघदेवाला पूजतात.

***3) नागदेव*** – नागासारखे प्राणी मानवी जीवनात देवरूपात आहेत म्हणून नागदेवाची पूजा केली जाते.

***4) भवानीमाता*** – भवानी म्हणजे पार्वती होय. या जमातीत देवीचे रूप कल्याणकारी मानले जाते.

***5) म्हसोबा*** – म्हसोबा ग्रामसंरक्षक देव असल्याने त्याचे ठिकाण गावाबाहेर असते तसेच राम, मारूती, महादेव, अश्वत्थामा अशी प्रतीकांची देवळेही आहेत. देव–देवतांचा ठराविक आकार नसून दगड, लाकूड, झाडे, फळे हीच त्यांची देवता प्रतीके आहेत.

***6) राणीकाजल देवी*** – ही पर्जन्य देवता आहे. पाऊस पडावा म्हणून राणीकाजल देवीची आराधना केली जाते.[3]

### सण–उत्सव :

आदिवासी जमातीचे लोक विविध सण–उत्सव साजरे करतात. सातपुड्यातील आदिवासी लोक होळी, दिवाळी, पोळा, दसरा, नागपंचमी, गुढीपाडवा, अक्षय्यतृतीया इत्यादी सण साजरे करतात.

होळी हा महत्त्वाचा सण–उत्सव रूपात साजरा होतो. यात बेधुंद नाचणे, गाणे–बजावणे होय. हा सण म्हणजेच शिमगा साजरा करणे होय. तर आदिवासींचा दिवाळी सण हिंदु धर्मीयांच्या दिवाळीनंतर एक महिन्याने येत असतो. गावापरत्वे वेगवेगळ्या प्रकारे दिवाळी साजरी केली जाते. रात्री सामुदायिक नृत्ये केली जातात. दिवाळी–होळी हे आदिवासींचे अतिशय महत्त्वाचे सण आहेत. दसरा हा मोठ्या आनंदाचा सण असतो. त्या दिवशी हत्यारांची पूजा केली जाते. ढोल बडवून सामूहिक नृत्याचा आनंद घेतला जातो. इतर खानदेशी समाजाप्रमाणे आदिवासी लोकही पोळा हा सण साजरा करून बैलांची पूजा करतात. त्याचप्रमाणे नवे धान्य घरी आल्यावर नव्याचा सणही साजरा करतात.[4] पावसाळ्यात गवत मोठे झाल्यावर त्याचीही पूजा करतात. त्याला निलीचारीची पूजा म्हणतात. या पूजेनंतरच आदिवासी लोक हिरवा भाजीपाला सेवन करतात. याबरोबरच नोबाई, इंदलपूजा सारख्या पूजाही आदिवासी समाजात अस्तित्त्वात आहेत.

*नाच–गाणे :*

आदिवासी जमातीत त्यांच्या संस्कृतीची काही खास वैशिष्ट्ये आहेत. त्यात नाच–गाणे, लोकनृत्ये व लोकसंगीत यांचा अंतर्भाव होतो. आदिवासींच्या लोकनृत्याचा मूलभूत गुण म्हणजे अमाप उत्साह, जोष, जोमदारपणा, ताल आणि नाद यांचा संगम होय. आदिवासी लोक नृत्याला जास्त महत्त्व देतात.[5] नृत्ये हंगामाच्या, ऋतुमानाच्या वेगवेगळ्या स्थित्यंतरानुसार केली जातात. सण उत्सवातील नृत्यांचा संबंध देव–देवतांशी जोडला जातो. म्हणूनच नृत्याला पावित्र्य प्रदान केले जाते. म्हणजेच देव–देवतांना प्रसन्न करण्यासाठी केली जाणारी पवित्र कृती म्हणजे नृत्य होय अशी आदिवासींची धारणा आहे.[6] सातपुड्यातील आदिवासी भोगोऱ्या, मेलादा, गेर, बावा–बुध्या, दिंडल अशा विविध प्रकारची नृत्ये करतात.

*भगत :*

अलौकिक विश्वातील भूत, पिशाच्च, देव इत्यादी दिव्य प्राणी त्यांच्या विशेष सामर्थ्याने मानवी जीवनावर दूरगामी परिणाम करतात, अशी मानवाची दृढ श्रद्धा आहे. त्या दिव्य प्राण्यांना सदैव संतुष्ट करण्यासाठी धार्मिक विधी केले जातात. हा विधी करणारा कौशल्यवान असतो. धार्मिक विधी करण्यात पारंगत असतो. अशा धर्मव्यावसायिकांना भगत असे म्हणतात. ही माणसे दैवी आपत्तीतून मुक्त करून शुभ गोष्टी घडवून आणतात. अशा अधिकारी व्यक्तींना भगत म्हणतात.[7] आदिवासी समाजात भगताला फार महत्त्व असते. भगताच्या अंगात देव येतो. तो मानवी जीवन संपन्न, रोगमुक्त करतो असे मानले जाते. म्हणूनच भगताच्या सांगण्यावरून देवाला नवस–सायास केले जातात.

*अंधश्रद्धा :*

आदिवासी जमातीत जादूटोणाबरोबरच भूते–खेते, पिशाच्च, डाकीण, मूठ मारणे, नजर लागणे, वेताळ, सैतान याविषयी आजही अंधश्रद्धा आहेत. रोगराईचा प्रसार होणे म्हणजे 'देवीचा कोप' मानला जातो. भूतबाधा, जादूटोणासारख्या बाबींवर दृढ अंधःश्रद्धा आहे. अर्थात 'भगत' हाच त्यांचा वैद्य असतो. काही जाणकार भगत वनौषधींचा वापर करतात.

*व्यवसाय :*

सातपुडा पर्वताच्या डोंगर उतारावर, दऱ्या–खोऱ्यात येथील आदिवासींची वस्ती आहे. पठारी व उतरणीवरील जमीनीवर येथील लोक शेती करतात. ज्वारी, तांदूळ, मठ, मूग तसेच काहीप्रमाणात भाजीपाला याचे उत्पादन हे लोक काढीत असतात. शेती हाच मुख्य व्यवसाय असला तरी काही लोक शिकार व मासेमारी करतात. तसेच पशुपालनादि व्यवसायही आदिवासी लोक करतात.

**कला :**

आदिवासी लोक निराकार दगडाकडे शक्तीदैवत म्हणून पाहतात. याकरिता आदिवासी लोकांना मूर्तिकला अवगत आहे. याचबरोबर इतर मानवी समूहाप्रमाणेच आदिवासी जमातीतील लोकांना चित्रकला अवगत आहे. स्त्रिया आपल्या घरांच्या भिंतीवर सुंदर नक्षीदार चित्रे काढतात. त्यांच्या चित्राकृतीत फुल, पक्षी, पाने, झाडे, सूर्य, प्राणी अशा चित्रांचा समावेश आढळतो. याबरोबरच शेणमाती, भाताचे साळवणे, लाकडी व कागदी लगद्याचे मुखवटे तयार करतात. लाकडावरील कोरीव कामही विशेष विलोभनीय असते.

*वैशिष्ट्ये :*

सातपुड्यातील आदिवासी जमातीची काही ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. एकत्र व विभक्त अषा दोन्ही प्रकारच्या कुटुंबसंस्था असतात. पुरुषप्रधान संस्कृती असली तरी स्त्रीचे रूप देवीचे मानले जाते. स्त्री–पुरुष दोघेही स्वच्छंदी जीवन जगतात. स्त्रीने स्त्रीधर्म पाळणे महत्त्वाचे मानतात. तिला दागिन्यांची हौस असते. ती जास्त करून चांदीचे असतात. न्याय–निवाडा, तंटे–बखेडे मोडण्याकरिता प्रतिष्ठित लोकांची पंचायत असते. त्यांच्या शब्दाला महत्त्व असते. भाषा ही त्यांची व्यवहार बोली असते. जमातीपरत्वे बोली भिन्न असते. त्यांच्या भाषेची स्वतंत्र लिपी नसल्याने साहित्य हे देवनागरीतून लिहावे लागते. आदिवासींचे देव–देवता आणि 'धर्म' म्हणजे निसर्ग होय. सृष्टीतील प्रत्येक गोष्टीत त्यांना 'देवत्व' वाटते, त्या देवत्वापुढे नतमस्तक होणे हाच खरा अनादि काळापासूनचा 'धर्म' आहे. ज्याने जन्माला घातले तोच देतो आणि घेतोही, म्हणून विविध स्वरूपात पूजा करणे हाच त्यांचा 'धर्म' होय, याचाच परिणाम 'दगड गोट्यात' त्यांना देवत्व वाटते.

*सारांश :*

सातपुड्यातील आदिवासी जमातीचा सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहास पाहिला तर ही जमात पूर्णतः स्वयंभू आहे. कारण इतर प्रचलित कोणत्याही धर्माचा आणि धर्माचरणाचा स्वीकार ह्या जमातीने केला नाही. आदिवासी 'हिंदू' असल्याचे सांगितले जाते. त्यातही त्यांना स्वार्थ व आपमतलबीपणा वाटतो. हा धर्म आपल्यावर लादण्यासारखे वाटते. अर्थात वास्तवही तसेच आहे. कारण आदिवासींच्या सर्वच सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा ह्या हिंदुधर्मासह कोणत्याही धर्माच्या आणि धर्मतत्त्वज्ञानाशी साधर्म्य सांगत नाहीत. त्यांचे धर्मश्रद्धेचे प्रकार, देव–देवता, सण–उत्सव, नाच–गाणे, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, कला, सण–वार, कुटुंबपद्धती, स्त्रीजीवन, पंचायत व्यवस्था, बोलीभाषा, धर्माचरण यात कोणत्याही प्रस्थापित आणि प्रचलित धर्माचे प्रतिबिंब दिसत नाही. सातपुड्याच्या डोंगर–दऱ्यात राहणारी ही जमात अतिशय कष्टमय जीवन जगते. दारिद्र्याला मर्यादा नसतांनाही सण–उत्सव साजरे करून नाच–गाण्यातून नेहमी आनंदित राहतात. म्हणूनच प्राचार्य भास्करराव पाटील म्हणतात की, आदिवासींच्या बाबतीत 'जीवन म्हणजे संघर्ष !' नसून 'संघर्ष म्हणजे जीवन' आहे. संघर्षातही ते आनंदी, स्वच्छंदी राहतात. म्हणूनच आदिवासींनाच खरा जीवनाचा, जगण्याचा, संघर्षाचा अर्थ कळला आहे. आजही त्यांनी आपली संस्कृती जोपासली आहे.

***संदर्भग्रंथ***
1) संगवे डॉ. विलास, आदिवासींचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, 1978, पृ. 28.
2) गारे डॉ. गोविंद, आदिवासींची लोकनृत्ये, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1989, पृ. 45.
3) तत्रैव.
4) हिवाळे डॉ. अलका, आदिवासी लोकगीतातील स्त्रीजीवन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2002, पृ. 48.
5) गारे डॉ. गोविंद, उपरोक्त.
6) गारे डॉ. गोविंद, आदिवासी कला, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, 2002, पृ. 4.
7) संगवे डॉ. विलास, उपरोक्त, पृ. 247.
8) पाटील डॉ. भास्करराव व पगारे डॉ. संजीव, सातपुड्यातील आदिवासी लोकसंस्कृती, धुळे, 2010, पृ. 92 ते 95.



*प्रा. दिलीप आत्माराम शिरसाठ*
*इतिहास विभाग प्रमुख, ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे कै. म. दि.सिसोदे उर्फ भाऊसाहेब कला, वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org